शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.उपनिरीक्षक काकासाहेब बापु राख,
वयः - ५७ वर्षे,
नेमणुक. - सोनई पोलिस स्टेशन
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे यांचे मार्फत सुरुः-

दि. २८/०४/२०२४ रोजी मी सोनई पोलिस स्टेशन येथे सहा.फौ. म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी मला ठाणे अंमलदार ही ड्युटी होती. सदर दिवशी कोबींग ऑपरेशन चालु असताना ए.पी.आय शेळके साहेब यांना फोनद्वारे गोपनिय माहिती मिळाली की, पानसवाडी शिवारात काही इसम हातभट्टी दारू तयार करत आहेत. त्यानंतर ए.पी.आय शेळके, हवालदार गावडे, पो.कॉ. रवी गर्जे, पो.कॉ. आघाव यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला. तिथे आरोपी बाळासाहेब काकाजी ब्राम्हणे व मुद्देमाल मिळुन आला. सदर गुन्हा नोंदवण्यात आला. त्याप्रमाणे सदर गुन्हाचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला.

२. मी आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) ची नोटीस दिली. आता मला सदरची नोटीस दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यांस निशाणी २० देण्यात येते. सॅम्पल रासायनीक विश्लेशण केंद्र नाशिक येथे पाठविण्यात आले. आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात हजर केले. मी आरोपींस पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. पी.सी.नहार यांचेमार्फत सुरु-

३. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा सांगितला. हे म्हणणे खरे आहे की, पानसवाडी जवळ कारखाना आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिथे गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याजवळ महेश हॉटेल आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजुबाजुंच्या लोकांचे जबाब घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करून केवळ कोठा पुर्ण

करण्यासाठी आरोपीविरूध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक-१४/०७/२०२५.